02

Lala Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII    Issue - I    Marathi Part - II    January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शेतीवर आधारीत उद्योगधंदा<br>डॉ. सुभाष प्रभु राठोड | १-४ |
| २ | भारतीय शेती व कमी उत्पादकतेची कारणे<br>प्रा. डॉ. बी. आर. शिंदे | ५-७ |
| ३ | जागतीकीकरण आणि भारतीय शेती व्यवसाय<br>प्रा. डॉ. शिवांगी संजयराव दहिटणकर | ८-१० |
| ४ | सेंद्रीय शेती<br>डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर | ११-१३ |
| ५ | शाश्वत कृषी विकास आणि सेंद्रिय शेती<br>डॉ. सुभाष रा. यादव | १५-१८ |
| ६ | भारतीय शेतीची उत्पादकता : एक अभ्यास<br>प्रा. दिनकर टकले | १९-२२ |
| ७ | भारतीय शेतीचा शाश्वत विकासात पायाभुत सुविधांचे योगदान<br>प्रोफेसर डॉ. के. के. पाटील<br>सतिश दिलीपराव तोडकर | २३-२६ |
| ८ | वातावरण बदलाचे शेतीवरील परिणाम<br>डॉ. विश्वनाथ कोक्कर | २७-२९ |
| ९ | कृषी आणि शाश्वत विकास<br>अप्पाराव वागडव | ३०-३२ |
| १० | हरितक्रांतीचे परिणाम<br>डॉ. नंदकिशोर मुळे | ३३-३५ |
| ११ | शाश्वत शेती काळाची गरज<br>चंद्रकांत रामराव वलाकटे | ३६-४० |
| १२ | शेती व्यवसायातील शाश्वत विकास समस्या आणि उपाय<br>प्रा. विठ्ठल जी. चव्हाण | ४१-४४ |
| १३ | शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे<br>भगवान विष्णु शिंदे | ४५-४७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २. भारतीय शेती व कमी उत्पादकतेची कारणे

प्रा. डॉ. बी. आर. शिंदे
कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ, जि. परभणी वाणिज्य विभाग.

Late Ramesh Warpudkar A.C.S. Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

भारत हा कृषी प्रधान देश असुन भारतातील लोकांचा मुख्य व्यावसाय प्राचीन काळापासुन शेती आहे.

शेती हा व्यावसाय भारतीय अर्थव्यवस्थेचा म्हत्वाचा घटक आहे. म्हणुन भारतात शेतीला अनन्यसाधरण महत्व आहे. कारण भारतीय एकूण लोकसंख्येपैकी 60: जनता अजुनही शेतीवर अवलंबून आहे. भारतातील जनतेला लागणारा अन्न धान्य पुरवठा व उद्योगाना लागणारा कच्चामाल शेतीच्या माध्यमातुन पुरवला जातो. त्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय शेती हा व्यवसाय प्राचीन काळापासुन असुन आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा. समजुन शुध्दा भारतीय शेतीची अत्पादकता जगातील इतर देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. कोर्ड फाउंडेशन जागतीक समीतीच्या अहवाला नुसार भारतीय शेतीची उत्पादकता जगातील इतर देशाच्या तुलनेत अतिशय कमी आहे. ही एक देशाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. त्यामुळे भारतीय शेतीच्या कमी उत्पादइकतेची कारणे शोधने व आम्यासणे आवश्यक आहे. ही कारणे या लेखात आम्यास नार आहोत.

**भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे.**

**1. भारतातील शेतीवर लोकसंख्येचा अती भार.**

भारताची लोकसंख्या दिवसेन दिवस वाढत आहे. भारत स्वतंत्र्य झाला तेव्हा भारताची लोकसंख्या अंदाजीत 33 कोटी होती ती आज 2.5 पटीत वाढली, ज्या पटीत लोकसंख्या वाढत आहे. त्या पटीत देशात इतर क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत त्यामुळे लोकसंख्या वाढीचा सर्व भार शेतीवर पडतो. 1981मध्ये भारतात शेती व्यावसाय करणा–याची संख्या 44.2 कोटी ऐवढी होती तर 1991 मध्ये 59 कोटी ऐवढी लोकसंख्या शेतीवर काम करत होती. परंतू दिवसेन दिवस भारतीय लोकसंखेचा भार शेतीवर पडत गेला त्यामुळे भारतीय शेतीचे लहान लहान तुकडे विभाजीत झाले त्याचा परिणाम म्हणून भारतीय शेतीची उत्पादकता घटत गेली.

**2. भारतीय सामाजीक चालीरीती.**

भारतातील सामाजीक चालीरीती धर्मावर आधारलेल्या म्हणजेच मागासलेलचा पारंपारीक आहेत. आजही भारतातील ग्रामीण भागातील शेतकरी अज्ञानी, अंधश्रध्दाळू, परंपरावादी आहेत त्यामुळे भारतीय शेतकरी अधुनिक तंत्राच्या पध्दतीने शेती करण्यासाठी तयार नाहीत तर ते परंपरागत तत्रं वापरुन शेती करतात. ते धर्म वेडे आहेत आजही भारतीय शेतकरी शेतीची कामे कोणत्या दिवशी सूरू करावयाची कोणत्या दिवसी बंद ठेवावयाची म्हणजे भारतीय शेतकरी आधुनिक काळात शुध्दा धर्म शास्त्राचा आधार घेवून शेतीची कामे करताना दिसतात. त्यामुळे भारतीय शेतीच्या उत्पादन वाढीसाठी अनुकूल असे वातावरण तयार होताना दिसत नाही म्हणून भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.



CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

Late K... Warpudkar ... Sonpeth Ta.Sonpeth Dist.Parbhani Pin-431516

**3. भारतीय शेतीचा लहान आकार.**

भारतातील ग्रामीण शेतकरी अज्ञानी, अशिक्षित, असंघटीत आहेत. आणि भारतातील झपाटयाने वाढ... लोकसंख्या त्यातील 60% लोकांचा मुख्य व्यावसाय शेती देशातील प्रत्येक व्यक्तीला शेतीची असलेली अभि... आणि वारसा हक्काने त्यांना मिळणारी शेती अशा अनेक कारणाने भारतात पुर्वीपासुन होणारे शेतीचे विभाजन त्य... भारतीय शेतीचा दिवसेन दिवस आकार लहान होताना दिसतो. आज भारतात 2 एकर ते 5 एकर ऐवढे लहान तु... निर्माण झाले आहेत. त्याच्या कडे पुरेशे असे शेती करण्यासाठी शेतीला लागणारी शाधने शुध्दा माहीत. त्याना... करण्यात ब–याच अडचणी ला तोंड दयावे लागते. म्हणून शेतक–याना मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेणे शक्य नाही. म्हणुन आजही जगातील इतर देशाच्या तुलनेत उत्पादन कमी होताना दिसते.

**4. जमीनदारी पध्दती.**

भारतात शेतीची उत्पादकता कमी असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतात अनेक वर्षा पासुन प्रच... असणारी जमीनदारी पध्दती होय. जमीनदारी पध्दतीत जमीन एका विशिष्ट मालकीची परंतू ती जीमण कस... व्यक्ती दुसरी यामुळे देशात शेती कसणा–या शेतक–याचे मोठया प्रमाणावर शोषण केल्या जाते. यात... कसणा–या व्यक्तीचा आर्थिक विकास होत नाही व शेतीची उत्पादकाता ही वाढत नाही. त्या शेतक–यातील शेत... उत्पादकता वाढवण्यातील उत्साह कमी होवून त्याच्यात अकार्यक्षमता वाढते. परंतू स्वतत्र्योतर काळात ही पध्दत... करून देशात भारत सरकारनी कुळ कायदा केला त्यात कसले त्याची जमीन या ताब्याची अमंलबजावणी कर... आली या कायदयात अनेक शेतक–यांना जमीनी मिळालया परंतू हया कायदयाचां पुढे अमंलबजावणी होत अस... दिसुन येत नाही आजही भारतात अनेक मोठया शेतक–यांन कडे हजारो एकर जमीन आहेत. हया जमीनी... पध्दतीने कसल्या शुध्दा जात नाहीत म्हणून त्या जमीनीतुन योग्य ते उत्पादन मिळत नाही त्याचा परिणाम भा... शेतीतील उत्पादणावर होतो.

**5. भारतातील शेतीसाठी पाण्याच्या सोयी.**

भारत हा कृषी प्रधान देश आसलयामुळे शेतीच्या उत्पादन वाढीसाठी मोठया प्रमाणावर पाण्याची गरज... भारतात मोसमी वा–यापासुन दरवर्षी 40 इंच पाउस पडतो. परंतू हा पाउस लहरीव अनियीमत असतो. असा... कधी जास्त तर कधी कमी पडतो. आज भारतात 30% जमीनीला कृत्रिम पध्दतीने पाण्याच्या सोयी केल्या आहे... 70% जमीन नैसर्गिक पावसावर अवंलबुन आहे. ज्या 30% जमीनीला कृत्रीम पाण्याच्या सोयी केलेल्या आहे... शुध्दा मान्सूनवरच्या पावसावर अवलंबून आहे. कारण पाउस चांगला पडला तर पाण्याची धरणे भरतात असा... शेतीला योग्य पध्दतीने पाण्याचा पुरवठा करता येतो. परंतु पाउस कमी झालातर धरणामध्ये पाणी कमी असते... वेळी पाण्याचा पुरवठा योग्य पध्दतीने होत नाही. त्याच बरोबर शेतीला पाण्याचा पुरवठा येथील व्यापारी, ... अडते, करीत असतात या वर भारतातील सरकारचे फारसे नियंत्रण नाही. शेतक–याना कसल्या प्रकारचे संरक्षण... जात नाही त्यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी असलेली दिसुन येते.

**6. भारतात शेतीत लागवडीची पध्दती पांरपारीक.**

भारतात शेतीतील लागवडीच्या पध्दती आजही पांरपारीक आहेत.

भारतीय शेतकरी आजून आधुनिक बि–बियान्याचा वापर, तसेच रासायनिक खते, त्याच बरोबर कीटकनाशके पाहीजे त्या प्रमाणात वापर केलेला दिसत नाही म्हणून आजही भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसते.

**7. भारतात शेतीसाठी भांडवल पुरवठा करणा–या संस्थाचा अभाव.**

भारतात शेतीची उत्पादकता कमी असण्याचे हे एक महत्वाचे कारण आहे. भारतीय शेतकरी गरीब आणि अज्ञाणी अशिक्षीत आहेत. त्याच्याकडे शेती करण्यासाठी लागणा–या साधनांचा व भांडवलाचा अभाव आहे. ऐवढेच नव्हेतर पंत पुरवठा करणा–या संस्थची भारतीय शेतक–यानां माहीती नसते व पत पुरवठा करणा–या संस्था संख्येने कमी असल्याने भारतीय शेतक–याना भांडवलाचा पुरवठा करू शकत नाहीत.

**8. शेतक–याच्या शेती मालावीषयी सुविधा.**

भारतातील शेतक–यानी विकलेल्या शेतीमाला विषयी व्यवस्थापन पध्दती आणि व्यवस्था अत्यंत दोषपुर्ण आहे. शेतक–यानी उत्पादन केलेल्या मालाची साठवण करण्यासाठी योग्य पध्दतीची गुदाम व्यवस्था नाही. वाहतुकीच्या सोयी नाहीत. भारतातील गरीब शेतक–याच मोठया प्रमाणात शोषण येथील व्यापारी, दलाल, अडते करीत असतात या वर भारतातील सरकारचे फारसे नियंत्रण नाही. शेतक–याना कसल्या प्रकारचे संरक्षण दिले जात नाही त्यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी असलेली दिसुन येते.

**9. आधुनिक तंत्र ज्ञानाचा अभाव.**

भारतातील शेतकरी आजही आधुनिक तंत्र वापरले जात नाही.परंतु जागतीक स्पर्धेत भारतीय शेतीमाल व शेतकरी टीकून राहाण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर केला पाहीजे. शेतीसाठी लागणारे नविन यंत्र सामग्री वापरणे आवश्यक आहे. नविन यंत्र सामग्री च्या वापरामुळे शेतीतील सुपीकता वाढवीण्यास मदत होते. परंतु योग्यती वापर होत नाही त्याचा परिणाम भारतीय शेतीच्या उत्पादनावर होतो.

**10. शेती उंदर निर्वाहचे साधन**

भारतातील शेतकरी शेतीकडे उंदर निर्वाहचे साधन म्हणून पहातात "व्यवसाय " म्हणुन पाहीले जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी शेतीचा विकास करून शेतीची उत्पादकता वाढवत नाहित. तर पोटापुरते अन्न उत्पादन करणे हाच शेती करण्याचा बहुतांश शेतक–याचा उद्देश असतो त्यामुळे ते उत्पादन वाढवीण्याच्या पर्यंत नाहित.

**निष्कर्ष.**

भारत हा प्राचीन काळापासुन कृषी प्रधान देश असुन व भारतातील 60% ते 70% लोक शेतीवर अवलबुन असुन सुध्दा भारतीय शेतीचा विकासकरण्यासाठी लागणा–या सुविधा पुरवील्या जात नाहित हे शेतकरी आजुनही पारंपरीक पध्दतीने शेती करतात. भारतीय शेतकरी अशिक्षीत आहेत. आजही भारतीय शेतीची उत्पादकता वाढवीण्यासाठी पुरेसा वाव आहे. परंतु त्याच्यां अज्ञानामुळे शेतीची उत्पादकता वाढत नाही.

**संदर्भ**

1. डॉ. मेधा कानेरकर –भारतीय अर्थव्यवस्था
2. प्रा. डॉ. पाना भुतेकर– महाराष्ट्राची अर्थव्यवस्था
3. भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप – डॉ.जकताप, वाणी, जंगले, पाटील

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani